**मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम,२०२१ ची अंमलबजावणी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह (परिवहन) विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- एमव्हीआर-०५२२/प्र.क्र.४१/भाग-१/परि-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २७ जानेवारी,२०२३

**<u>वाचा</u> :-** १) केंद्र शासनाच्या दि.२३.०९.२०२१ व दि.१३.०९.२०२२ रोजी मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.No.४४(१)/PF-S/२०२२-२३ (CAPEX), दि.१६.१२.२०२२.
३) केंद्र शासनाचे मा.सचिव (परिवहन) व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केलेले पत्र क्र.RT-२३०१३/८/२०२२-T, दि.१७.१२.२०२२.

**<u>प्रस्तावना</u> :-**

राज्यातील वाहनांचे प्रदूषण कमी करणे, रस्त्यावरील प्रवासी तसेच वाहनांच्या सुरक्षिततेमध्ये वाढ करणे, वाहनांची इंधन कार्यक्षमता सुधारणे, वाहनांवरील देखभाल खर्च कमी करणे तसेच जुन्या वाहनांच्या बदल्यात नवीन वाहने वापरात आणणे व त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये गुणात्मक सुधारणा होण्यासाठी केंद्र शासनाने मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ प्रसिध्द केले असून तद्नुषंगाने धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे (Operational guidelines for setting up of Registered Vehicle Scrapping Facility) निर्ममित करण्यात आली आहेत. याबाबत राज्यातील शासकीय, निम-शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे अधिनस्त कार्यालयातील नोंदणी दिनांकापासून १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने निष्कासित (Scrap) करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ राज्यात राबविण्यात येत आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या दि.१६.१२.२०२२ व दि.१७.१२.२०२२ च्या पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील शासकीय, निम-शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे अधिनस्त कार्यालयातील नोंदणी दिनांकापासून सदर शासन निर्णयाच्या

दिनांकापर्यंत १५ वर्षे किंवा १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने Registered Vehicle Scrapping Facility मार्फत निष्कासित (Scrap) करण्यात यावीत व सदरची कार्यवाही केंद्र शासनाच्या दि.१७.१२.२०२२ रोजीच्या पत्राप्रमाणे करण्यात यावी.

२. जी शासकीय वाहने १५ वर्षापेक्षा जास्त वयाची आहेत व ज्यांचे निर्लेखन करण्यात आले नाही, परंतु ती आज अखेर वापरात आहेत अशी वाहने निष्कासित केल्यानंतर त्या वाहनांच्या बदल्यात संबंधित विभागास प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन नवीन वाहने खरेदी / भाडे तत्वावर घेता येतील.

३. मोटार वाहन विभागाच्या संगणकीय अभिलेखानुसार शासनाची एकूण ४६३१ इतकी वाहने १५ वर्षे पेक्षा जास्त वयाची आहेत. सदर वाहने संबंधित विभागांनी दि.३० जून, २०२४ पर्यंत Registered Vehicle Scrapping Facility मार्फत निष्कासित (Scrap) करावीत.

४. सदर अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही परिवहन आयुक्त कार्यालयाने तात्काळ करावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या विनियम कार्यासनाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२७/२०२३/विनियम, दि.१८.०१.२०२३ व साधनसंपत्ती कार्यासनाचा अनौपचारिक संदर्भ क्र.५/सासं, दि.२४.०१.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०१२७१४५४४४२४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(भि. ओं. ठाकूर)**
**कार्यासन अधिकारी, गृह विभाग**

**प्रत,**

१) मा .राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री याचे अपर मुख्य सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा.मंत्री, मंत्रालय, मुंबई.

५) मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
६) मा .सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
७) मा.विरोधी पक्षनेता विधान सभा यांचे खाजीग सचिव, विधान भवन, मुंबई.
८) मा.विरोधी पक्षनेता विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
९) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव (वित्त)यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव (परिवहन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.
१४) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५) अपर परिवहन आयुक्त
१६) परिवहन उपायुक्त (अंमल-२)
१७) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा(, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१८) महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा(, मुंबई .
१९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, वांद्रे (पूर्व(, मुंबई ४०० ०५१.
२१) वित्त विभाग (सेवा-५), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२२) गृह विभाग (बीयुडी २/परिवहन ४) मंत्रालय, मुंबई.
२३) निवडनस्ती.